# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

जा.क्र.2020/डिसी-2 /कोव्हीड-19/कावी दिनांक 19.04.2020

**विषय** :- शासकीय,खासगी उदयोग आणि औदयोगिक संस्थां सुरु करणे बाबत.

**संदर्भ** :- 1-या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डिसी-1/Crpc-144 कावी दि.31/03/2020 व 13/04/2020

2-या कार्यालयाचे आदेश जा.क्र.2020/डिसी-1/ कोवीड-19/कावी- दिनांक 27/03/2020 व दि.30/03/2020

3. या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डि सी-1/कोव्हीड-19/कावी दि.13/04/2020

4. महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.17/04/2020.

आदेश

ज्याअर्थी संदर्भीय आदेश क्र. 3 अन्वये जिल्हयातील औदयागीक संस्था, कारखाने ,उदयोग धंदे व तत्सम व्यवसाय करण्यासाठी संबंधीत आस्थापनेवरील हिंगोली जिहयातील विविध ठिकाणावरुन तसेच हिगाली जिल्हयाबाहेरुन देखील कामगार/कर्मचारी वाहतुक करण्या-या व्यक्ती येत असतात.यामुळे करोना विषाणुचा संसर्ग वाढण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणु संसंर्गात अधिक वाढ होवु न देता उपाययोजना राबविणे आवश्यक आहे.आणि संबंधील औदयागीक आस्थापनेच्या ठिकाणी होणा-या गर्दीमुळे आपत्तीजन्य परिस्थिती हिंगोली जिल्हयात उदभवु नये या करीता संबंधित उदयोग धंदे संदर्भीय आदेशानुसार बंद ठेवण्यात आले होते.

ज्याअर्थी संदर्भीय क्र. 4 च्या अधिसुचने नुसार दि. 17/04/2020 रोजी राज्य शासनाने लॉकडाऊन संदर्भात नवी सर्वसमावेशक अधिसुचना जारी केली असुन यात अतिरिक्त औदयागिक घटकांसह शेतीविषयक बाबती, बांधकाम क्षेत्र आर्दीना अधिक सुट देण्यात आली असुन सोशल डिस्टन्सिंगच्या नियमांचे पालन करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

त्याअर्थी मी रुचेश जयवंशी जिल्हाधिकारी हिंगोली नगरपालीका/नगरपंचायत क्षेत्राच्या बाहेरील भागातील खालील शासकीय,खासगी उदयोग व औदयोगिक संस्था दि.20/04/2020 पासुन सुरु ठेवण्याकरीता या आदेशाव्दारे परवानगी देत आहे.

1. ग्रामीण भागातील सर्व प्रकारचे कृषी, फलोउत्पादन व कृषी प्रकीया , पॅकेजींग आणि वाहतुक उदयोग.
2. उत्पादन एकक ,ज्यात प्रक्रिया सातत्याची आवश्यकता आहे आणि पुवठा साखळीतील उदयोग.
3. कोळसा उदयोग, खान आणि खनिज उदयोग त्याची वाहतुक खानीसाठी आवश्यक असलेल्या विस्फोटकांचा पुरवठा.
4. पॅकेजींग उदयोग.
5. ग्रामिण भागातील विटभट्टया.
6. गव्हाचे पिठ डाळी आणि खादयतेलाशी संबंधित सुक्ष्म लघु व मध्यम उदयोग.

**सदरील उदयोग सुरु करते वेळेस खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.**

1. संबंधितानी दिनांक 20/04/2020 पासुन उदयोगाची सुरुवात करताना संपुर्ण जागेचे सेनिटायझेशन करुनच सुरुवात करावी.
2. कामावर आलेल्या कामगार/खरेदीदार यांची नोंद ठेवणे गरजेचे आहे जसे की, नाव, संर्पकाचा पत्ता व मोबाईल क्रमांक.
3. कामगारांनी नेहमीच नाक आणि तोंड माक्सने पुर्णपणे झाकुन ठेवणे बंधनकारक आहे.
4. करोनाचा प्रादुर्भाव असलेल्या भागातुन कामगारांची ने आण करण्यास मनाई असेल.
5. उदयोजकांनी आपल्या कामगारांच्या राहण्याची व जेवण्याची व्यवस्था कामाच्या आवारात करावी लागेल.
6. दररोज कामावर येणा-या व्यवस्थापक/कर्मचारी/कामगारांची तपासणी थर्मल गन च्या सहाय्याने करण्यात यावी.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

7. उदयोजकानी कर्मचारी/कामगारासाठी मास्क व Sanitizer उपलब्ध करुन देण्यात यावेत.
8. उदयोगधंदयाच्या परिसरामध्ये कर्मचारी/ कामगारासाठी पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याच्या पाण्याची व्यवस्था योग्य ठिकाणी करण्यात यावी व पाणी उपलब्ध राहील यांची दक्षता घेण्यात यावी.
9. शासनाने ठरवुन दिलेल्या अंतराच्या परीसीमाचे तंतोतंत पालन करुन उदयोग धंदयाच्या ठिकाणी व परीसरामध्ये सामाजीक अंतराचे ( social Distance ) पालन करण्यात यावे व जागोजागी सुरक्षततेच्या उपाययोजनांचे माहिती फलक लावण्यात यावेत.

उपरोक्त नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन न करणा-या व्यक्ती, संस्था, अथवा समुह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढिल कार्यवाही करण्यात येईल यांची दक्षता घ्यावी.

(रुचेश जयवंशी)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण हिंगोली**

प्रतिलिपी

1. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव.
2. पोलीस अधिक्षक,हिंगोली यांना माहितीस्तव.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद हिंगोली.
4. महाव्यवस्थापक जिल्हा उदयोग केंद्र हिंगोली
5. व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य औदयोगीक विकास महामंडळ हिंगोली.
6. उपविभागीय अधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्तव
7. तहसिलदार हिंगोली/वसमत/औंढा/सेनगांव/कळमनुरी यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्तव
8. मुख्याधिकारी, नगरपालीका/नगर पंचायत हिंगोली,कळमनुरी, वसमत, औंढा, सेनगांव

(रुचेश जयवंशी)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण हिंगोली**

Scanned by CamScanner